Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी ( 4 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस पस्तीस :






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.

## ६. मायेची पाखर



सकाळी मी उठलो. अण्णांना कडकडून भेटलो. नकळतच माझ्या मुखातून शब्द बाहेर पडले, ''अण्णा, आपण खरेखुरे या मुलांचे आईबाप आहात. या मुलांचेच नव्हे, तर या महाराष्ट्रातील गोरगरिबांच्या मुलांचे आपण पालक आहात. आपणांस उदंड आयुष्य मिळो !''

अण्णा आयुष्यभर गोरगरिबांच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी झटत राहिले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर शाळा सुरू केल्या. उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये सुरू केली. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कार्यामुळे त्यांना सर्वजण 'कर्मवीर' म्हणून ओळखतात.

**– पां. चिं. पाटील**

(**मायेची पाखर** – पक्षी मायेपोटी आपल्या पिलांना पंखाखाली घेतात, तसेच आपल्या संस्थेत शिक्षणासाठी आलेल्या मुलांवर भाऊराव पाटील यांनी जिवापाड प्रेम केले.)

**शब्दार्थ :** **पोटात कावळे ओरडणे** – खूप भूक लागणे. **अधाशी** – हावरा, खादाड. **रुचकर**– चवदार. **बिछाना** – अंथरूण. **थंडीने कुडकुडणे** – खूप थंडी वाजणे. **पोटाशी धरणे** – मायेने जवळ घेणे. **ऊब** – उष्णता. **मायेचा वर्षाव करणे** – खूप प्रेम करणे. **उदंड** – खूप, पुष्कळ.

### स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पाहुण्यांनी अगोदर जेवायचे का नाकारले ?

(आ) वसतिगृहातील मुलांवर अण्णांची माया कोणाप्रमाणे होती ?

(इ) अण्णा आयुष्यभर कोणाच्या शिक्षणासाठी झटत राहिले ?

(ई) कर्मवीर भाऊरावांनी कोणत्या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शाळा सुरू केल्या ?

बेरीज सराव करा.

टेस्ट सोडवा

# ३. बेरीज

## उजळणी

उजळणी

◆ खालील बेरजा करा.

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३४२ | ३४५ | १७० | २९४ | ६०९ |
| + १२३ | + ३२४ | + ६२६ | + १०५ | + २०० |

◆ खालील बेरजांचे निरीक्षण करा.

| | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| | ४ | ३ | ० | १ |
| + | ३ | २ | ९ | ० |
| | ७ | ५ | ९ | १ |

| | दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|---|
| | ७ | ३ | २ | १ | ५ |
| + | | | ३ | ५ | २ |
| | ७ | ३ | ५ | ६ | ७ |

तीन अंकी संख्यांची बेरीज करताना ज्याप्रमाणे एककांत एकक, दशकांत दशक व शतकांत शतक मिळवतात, त्याचप्रमाणे चार अंकी किंवा पाच अंकी संख्यांची बेरीज करताना हजारांत हजार आणि दशहजारांत दशहजार मिळवतात.

◆ आडव्या मांडणीने केलेल्या बेरजेचे निरीक्षण करा.

७ ५ १ ३ + १ २ ७ ३ = ८७८६

प्रथम एककांत एकक मिळवू. नंतर दशकांत दशक, शतकांत शतक व हजारांत हजार मिळवू.

## स्वाध्याय

१. खालील बेरजा उभ्या मांडणीने करा.

(१) २३०१ + ४०५६  (२) ४०१७ + २०८१  (३) २०१७ + १७०६०

(४) ४७७७ + २००१  (५) ९४१ + ९९०५८  (६) १२३३६ + ५००२१

(७) ७७७७७ + २००१  (८) ९९९ + ४०००

२. आडव्या मांडणीने बेरीज करा.

(१) ७००६ + २१९३  (२) ४११ + ५८८  (३) २७९ + ९७४१०

(४) ५३०४६ + २००१  (५) ७०१३ + ९१४०५  (६) ९२९८ + ८०३०१

३. खालील तिन्ही स्तंभांमधील समान असलेल्या संख्या जोडा.

| | | |
|---|---|---|
| चौदा हजार अधिक तीनशे | ५०९ + १०० | ९९७०२ |
| दोन हजार अधिक नव्वद | १४००० + ३०० | ६०९ |
| पाचशे नऊ + शंभर | ९९००० + ७०२ | २०९० |
| नव्याण्णव हजार + सातशे दोन | २००० + ९० | १४३०० |

टेस्ट सोडवा

- add.

# 3. Addition

**Revision** **Revision**

◆ **Solve the following sums.**

(1) 342 + 123  (2) 345 + 324  (3) 170 + 626  (4) 294 + 105  (5) 609 + 200

◆ **Study the sums given below.**

| | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| | 4 | 3 | 0 | 1 |
| + | 3 | 2 | 9 | 0 |
| | 7 | 5 | 9 | 1 |

| | TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|---|
| | 7 | 3 | 2 | 1 | 5 |
| + | | | 3 | 5 | 2 |
| | 7 | 3 | 5 | 6 | 7 |

While adding three-digit numbers, we add units to units, tens to tens and hundreds to hundreds. In the same way, while adding numbers with four or five digits, thousands are added to thousands and ten thousands to ten thousands.

◆ **Study the horizontal arrangement of the sum given below.**

7 5 1 3 + 1 2 7 3 = 8786

First we add units to units. Then we add tens to tens, hundreds to hundreds and thousands to thousands.

**Exercise**

1. Arrange vertically and add.
   (1) 2301 + 4056  (2) 4017 + 2081  (3) 2017 + 17060
   (4) 4777 + 2001  (5) 941 + 99058  (6) 12336 + 50021
   (7) 77777 + 2001  (8) 999 + 4000
2. Add in horizontal arrangement.
   (1) 7006 + 2193  (2) 411 + 588  (3) 279 + 97410
   (4) 53046 + 2001  (5) 7013 + 91405  (6) 9298 + 80301
3. Match the equal numbers in the three columns.

| | | |
|---|---|---|
| Fourteen thousand plus three hundred | 509 + 100 | 99702 |
| Two thousand plus ninety | 14000 + 300 | 609 |
| Five hundred and nine + one hundred | 99000 + 702 | 2090 |
| Ninety-nine thousand + seven hundred and two | 2000 + 90 | 14300 |

टेस्ट सोडवा

## Listen and understand.

# A GARDEN OF WORDS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| am | feeling | long | red | tree |
| another | fresh | lovely | run | under |
| are | full | mango | see | us |
| ate | good | nap | sleepy | vegetable |
| behind | have | once | slept | very |
| carrot | he | patch | slow | walked |
| did | I'll | race | slowly | white |
| didn't | leafy | radish | so | wins |
| eat | let | ran | stop | woke |
| fast | little | reached | then | you |

**1. Listen carefully and tick off the words.**

* ate * did * eat * full * good * let * long
* nap * run * stop * tree * very * white * wins

**2. Find these words and copy them down.**

* Words that end with 'y'. * A word that begins with 'y'.
* Words that have 'double' letters. * Words that have the 'अ' sound.
* Words that have g an le ed sl .

**3. Select one word at a time. Look at the word carefully. Then close your eyes and think of the word. Write down the word. Look at it again. Is it right ? Look it up in the textbook. Learn five words at a time in this way.**

वरील प्रत्येक शब्दासाठी 8 x 4 cm किंवा अन्य आकारात जाड कागदाची कार्डे प्रत्येक मुलाकडून करून घ्यावीत व ती मुलांजवळच ठेवावीत. त्या शब्दांवर आधारित येथे दिलेले उपक्रम अशा कार्डांच्या साहाय्याने घेणे अधिक चांगले. वर्गातील अध्यापनाशिवाय इतर वेळीही या उपक्रमांचा गटात/एकट्याने सराव करण्यास मुलांना प्रोत्साहन द्यावे.

पाठ वाचा व समजून घ्या.


टेस्ट सोडवा

# ४. पिण्याचे पाणी

## माहीत आहे का तुम्हांला

- समुद्राचे पाणी चवीला खारट लागते. कारण ते मिठाचे नैसर्गिक द्रावणच आहे. आपण समुद्राचे पाणी पिण्यासाठी वापरू शकत नाही.
- वेगवेगळ्या विहिरींच्या पाण्याला वेगवेगळ्या चवी असतात. ते कशामुळे ? जमिनीतील काही पदार्थ पाण्यात विरघळतात. त्यांची चव विहिरीच्या पाण्याला येते. पण पाण्यात काहीही विरघळलेले नसेल, तर पाण्याला चव लागत नाही.
- सोडावॉटरच्या बाटलीचे झाकण काढले की एका वायूचे बुडबुडे फसफसून वर येतात. सोडावॉटर बनवताना कार्बन डायऑक्साइड नावाचा वायू दाब देऊन पाण्यात विरघळवलेला असतो. झाकण काढताच दाब कमी होतो आणि तो वायू फसफसून बाहेर पडतो.

## करून पहा



- एक मोठे भांडे पाण्याने भरून घ्या.
- पुढील वस्तू गोळा करा.

**कंपासपेटीतून :** प्लॅस्टिक स्केल, खोडरबर, पेन्सिलचा तुकडा, टोकयंत्र, रबरबँड, कर्कटक.

**घरातून :** स्टीलचा चमचा, प्लॅस्टिकचा छोटा चमचा, शेंगांची टरफले, खिळा, स्क्रू, नाणे.

**बागेतून :** काड्या, खडे, पाने, माती.

- यांपैकी एक-एक वस्तू पाण्यात टाकल्यावर ती बुडते की तरंगते ते पाहा.

**तुम्हांला काय आढळून येईल ?**

खोडरबर, टोकयंत्र, स्टीलचा चमचा, खिळा, स्क्रू, नाणे, माती, खडे या वस्तू बुडल्या, तर इतर वस्तू तरंगल्या.

**यावरून काय उलगडते ?**

काही वस्तू पाण्यात तरंगतात तर काही बुडतात.

**तरंगणाऱ्या वस्तू पाण्यापेक्षा हलक्या असतात. बुडणाऱ्या वस्तू पाण्यापेक्षा जड असतात.**

# ४. शिवरायांचे बालपण

## वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

किल्ल्यावर त्याला निजामशाहा म्हणून जाहीर केले. अशा प्रकारे त्यांनी एक नवे राज्यच स्थापन केले. या राज्यात गोदावरी ते नीरा या दरम्यानचा प्रदेश मोडत होता. आपल्या या राज्याचे संरक्षण करण्यासाठी शहाजीराजे मोठ्या शर्थीने लढले. या कामी आदिलशाहाने प्रथम त्यांना साथ दिली, पण पुढे खुद्द मुघल बादशाहा शाहजहान दक्षिणेत शहाजीराजांवर चालून आला आणि त्याने आदिलशाहास तंबी दिली, तेव्हा आदिलशाहाने शहाजीराजांच्या विरोधात त्याच्याशी मैत्रीचा तह केला.

आता मुघल व आदिलशाही यांच्या संयुक्त फौजांशी शहाजीराजे गनिमी काव्याने लढू लागले; परंतु एकटे शहाजीराजे त्यांच्याशी किती दिवस लढणार? त्यांची शक्ती अपुरी पडू लागली. तेव्हा नाइलाज होऊन १६३६ साली त्यांनी मुघलांशी तह केला. शहाजीराजांना काळ अनुकूल नव्हता, म्हणून त्यांचा स्वतंत्र राज्य स्थापण्याचा प्रयत्न तडीस गेला नाही; परंतु त्यांच्या या धाडसामुळे मराठी लोकांत आत्मविश्वास निर्माण झाला. शिवरायांना हा आत्मविश्वास पुढे स्वराज्य स्थापण्याच्या कार्यात उपयोगी ठरला.

**जिजाबाई व शिवराय कर्नाटकात:** शहाजीराजांची निजामशाही बुडाल्यानंतर तिचा प्रदेश मुघल व आदिलशाहा यांनी वाटून घेतला. शहाजीराजांची पुणे-सुप्याची पूर्वापार जहागीर आदिलशाही राज्यात आली, तेव्हा आदिलशाहाने ती जहागीर आपल्या वतीने त्यांना दिली. आता शहाजीराजांनी आदिलशाहीची सेवा स्वीकारली. आदिलशाहाने त्यांची पुण्यापासून दूर कर्नाटकातील प्रदेश जिंकण्याच्या कामावर नेमणूक केली. शहाजीराजे कर्नाटकात गेल्यानंतर काही काळाने जिजाबाई आणि शिवरायही त्यांच्याकडे गेले.

शिवरायांचे महाराष्ट्रातील बालपण धामधुमीत गेले होते. आज या किल्ल्यावर, तर उद्या त्या किल्ल्यावर अशी जिजाऊ-शिवबांची धावपळ चालू असायची. त्या वेळी वडिलांच्या पराक्रमाच्या गोष्टी लहानग्या शिवबांच्या कानी पडत असत. पुढे कर्नाटकात आल्यावर या मायलेकरांना थोडा स्वस्थपणा मिळाला. कर्नाटकातील अनेक राजांना शहाजीराजांनी जिंकले, तेव्हा आदिलशाहाने त्यांना बंगळूरची जहागीर बक्षीस दिली. आता बंगळूर हे शहाजीराजांनी आपले मुख्य ठाणे केले आणि तेथे ते एखाद्या राजासारखे वैभवात राहू लागले. दरबार भरवू लागले.

### स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) शिवरायांचा जन्म ......... किल्ल्यावर झाला.
(पुरंदर, शिवनेरी, पन्हाळा)

(आ) आदिलशाहाने शहाजीराजांची ............ प्रदेश जिंकण्याच्या कामावर नेमणूक केली.
(कर्नाटकातील, खानदेशातील, कोकणातील)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) जिजामातेच्या उपदेशाने शिवरायांच्या मनात कोणते विचार घोळू लागले ?

(आ) शिवराय मावळ्यांच्या मुलांबरोबर कोणते खेळ खेळत असत ?

(इ) शहाजीराजांनी निजामशाहीचा त्याग का केला?

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here